# पालकांचे शिक्षण

भारतात आज बालशिक्षणाचा म्हणजे प्राथमिक - पूर्व आणि प्राथमिक शिक्षणाचा प्रसार जेवढ्या वेगाने आणि जेवढ्या प्रमाणात होत आहे, तेवढ्या वेगाने आणि तेवढ्या प्रमाणात त्याचा दर्जा सुधारत नाही, ही खरी चिंतेची बाब आहे. किबहुना आजच्या झटपट शिक्षणपद्धतीत दर्जा सुधारत नाही, ही खरी चिंतेची बाब आहे. किबहुना आजच्या झटपट शिक्षणपद्धतीत दर्जा असा काही घसरत चालला आहे की, शिक्षण ही गोष्ट काही विशिष्ट हेतू डोळयांसमोर ठेवून काही विशिष्ट शास्त्रीय पद्धतींचा वापर करून आणि शिक्षण घेणाऱ्याना केंद्रस्थानी ठेवून, त्यांच्यावर वैयक्तिकरीत्या लक्ष पुरवून व्यवहारात आणावयाची असते. ही गोष्ट शिक्षक आणि पालक दोघेही विसरत चालले आहेत. या संदर्भात शिक्षकांची जबाबदारी तर मोठी आहेच, परंतु त्याहीपेक्षा अधिक पालकांची जबाबदारी आहे. मुले जेवढा वेळ शिक्षकांच्या ताब्यात असतात त्याहीपेक्षा अधिक वेळ ती पालकांच्या नियंत्रणाखाली असतात. शिवाय शाळेच्या थोडक्या वेळात, एका शिक्षकाला एकाच वेळी, चाळीस-पन्नास विद्यार्थ्यांकडे लक्ष पुरवावे लागते. पालकांना मात्र सामान्यतः एक-दोनच आणि स्वतःच्याच मुलांकडे लक्ष पुरवायचे असते.

पालक जागरूक असतील तर केवळ आपल्याच मुलांच्या बाबतीत नव्हे तर एकुण बालशिक्षणाच्या क्षेत्रातच क्रांतिकारक बदल घडवून आणू शकतील, परंतु आपल्या मुलांच्या भवितव्याची जबाबदारी शाळांवर म्हणजे पर्यायाने शिक्षक वर्गावर आणि धोरणविषयक गोष्टींसाठी सरकारवर टाकून, पालक मंडळी या बाबतीत हात झटकून मोकळी होतात. पालकांची उदासिनता हा बालशिक्षणाच्या आणि एकूण शिक्षणाच्याही क्षेत्रातला फार मोठा दोष आहे. पालकांचे दुर्लक्ष हा शिक्षणक्षेत्राला फार मोठा धोका आहे.

स्वतःच्या पाल्यांबाबतची पालकांची जागरूकता किती प्रभावी आणि कृतिशील ठरू शकते याची काही ठळक उदाहरणे, बालशिक्षणाच्या क्षेत्रांत दीपस्तंभासारखी आहेत.

'नूतन बालशिक्षण संघा'च्या अनेक वर्षे अध्यक्ष असलेल्या श्रीमती सरलादेवी साराभाई यांनी आपली मुले लहान असताना त्यांना उत्तम त-हेचे शिक्षण मिळावे असा विचार केला, परंतु त्या वेळी त्यातून निवड करावी अशा बालवाड्या किंवा प्राथमिक पूर्व शिक्षणाच्या काहीच सोयी उपलब्ध नव्हत्या. तेव्हा स्वतःच्या मुलांसाठी, स्वतःच्या देखरेखीखाली शिक्षण होईल अशी स्वतःचीच शाळा सुरू केली. ही गोष्ट १९१५ सालची. नुसती शाळा सुरु करून त्या थांबल्या नाहीत तर मुलांच्या विकासाचा विषय समोर ठेवून त्या वेळोवेळी विचार व सुधारण करू लागल्या. पुढे तर त्यांनी बालशिक्षणाच्या विकासासाठी नूतन बाल शिक्षण संघाशी स्वतःस जोडून घेतले.

दुसरे उदाहरण नूतन बालशिक्षण संघाचे संस्थापक स्वतः गिजूभाई बधेकांचे आहे. त्यांच्या पुढेही आपल्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न उभा राहिला होता. मॉंटेसरीबाईंच्या ग्रंथ वाचनाने त्यांना बालशिक्षणाची एक नवी दृष्टी प्राप्त झाली आणि केवळ स्वतःच्याच मुलांसाठी नव्हे तर समाजाच्या मुलांसाठी स्वतःची वकिली सोडून बालशाळा काढली आणि त्यातून पुढे उभ्या भारताला आधारभूत ठरेल, असे बालशिक्षणाचे नवे विश्व उभे केले.

श्रीमती ताराबाई मोडक यांचे उदाहरण तर आपल्या सर्वांच्या परिचयाचेच आहे. स्वतःच्या मुलीच्या शिक्षणाचा, विकासाचा विषय डोळयांपुढे ठेवूनच, भावनगरला चाललेला गिजूभाईचा बालशिक्षणाचा प्रयोग पाहायला त्या गेल्या आणि पुढे तर आपली मानाची व धनाची प्राचार्यपदाची नोकरी सोडून बालशिक्षणाला वाहून घेतले.

खरेखुरे जागरूक पालक, समाजोपयोगी असे केवढे क्रांतिकारक कार्य करू शकतात, हेच ही जागरूक पालकांची उदाहरणे दाखवून देतात.

प्रत्येक पालकालाच इतके उत्तुंग कार्य करता येईलच असे नाही, परंतु निदान स्वतःच्या मुलाचे शाळेत होणारे शिक्षण तपासून घेणे आणि तेथे घडणाऱ्या चुकीच्या शिक्षणाला विधायक विरोध तरी करता येईल की नाही?

❖